
Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

महात्मा गांधी व लालबहाद्दुर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन



। शुक्रवार, दि. २ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १७२ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

गॅस सिलिंडरनंतर सीएनजीच्या दरातही वाढ

मुंबई: ऑक्टोबरच्या पहिल्याच दिवशी महागाईचा दुहेरी झटका बसला आहे. एकीकडे १९ किलोच्या व्यावसायिक LPG सिलिंडरच्या दरात वाढ झाली असताना, दुसरीकडे मुंबई आणि आसपासच्या महानगर प्रदेशात CNGच्या दरातही प्रतिकिलो एक रुपयाने वाढ करण्यात आली आहे. महानगर गॅस लिमिटेडने (MGL) केलेल्या या दरवाढीनंतर मुंबई परिसरात CNGचा नवा दर ८९ रुपये प्रति किलो झाला आहे. या दरवाढीचा थेट परिणाम ऑटो रिक्षा, टॅक्सी, खासगी वाहने तसेच CNGवर चालणाऱ्या इतर वाहनांवर होणार आहे. त्यामुळे वाहनचालकांच्या दैनंदिन खर्चात वाढ होण्याची शक्यता असून, पुढील काळात रिक्षा आणि टॅक्सीच्या प्रवासी भाड्यावरही त्याचा परिणाम होऊ शकतो. मात्र, CNG दरवाढीनंतर भाडेवाढ तातडीने निश्चित झालेली नसून त्याबाबत संबंधित संघटना किंवा प्राधिकरणांकडून स्वतंत्र निर्णय अपेक्षित आहे.

‘लोकप्रतिनिधींना कायद्यापेक्षा वरचढ होता येणार नाही’; न्यायालयाचे स्पष्ट निरीक्षण

रमेश म्हात्रेंना सुप्रीम कोर्टाचा दणका!

डोंबिवलीतील डॉक्टर मारहाण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाची कठोर भूमिका

जन सम्राट टाईम्स

मुंबई । महापालिका रुग्णालयातील डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवरील कथित मारहाण प्रकरणात शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने मंजूर केलेला त्यांचा जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला असून, म्हात्रे व अन्य आरोपींना ५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कल्याण येथील न्यायदंडाधिकारी न्यायालयासमोर शरण येण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शरण न आल्यास जामीन बंधपत्र रद्द करून कायद्यानुसार पुढील कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने महाराष्ट्र सरकारच्या जामीन रद्द करण्याच्या अपिलावर सुनावणी करताना २८ सप्टेंबर रोजी उच्च न्यायालयाचा जामीन आदेश बाजूला ठेवला. या प्रकरणात वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा आणि कायद्याच्या राज्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने गांभीर्याने अधोरेखित केला. डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात ६ जुलै रोजी गर्भवती महिलेच्या



उपचारासंदर्भातील वादातून डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवर हल्ला झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात म्हात्रे यांच्यासह अन्य आरोपींविरोधात खटला सुरू आहे. पोलिसांनी या प्रकरणात आरोपपत्र दाखल केले असून, न्यायालयीन प्रक्रियेत आरोप निश्चित झाल्याचेही वृत्त आहे. सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारचा हल्ला सहन केला जाऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने लोकप्रतिनिधींच्या भूमिकेबाबतही व्यापक निरीक्षण नोंदवताना, लोकांनी निवडून दिलेल्या व्यक्तींवर कायद्याचे पालन करण्याची विशेष जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले. सर्वोच्च न्यायालयाच्या सविस्तर आदेशात सार्वजनिक अधिकाराची वैधता ही केवळ आदेश देण्याच्या सामर्थ्यावर नसून कायद्याच्या चौकटीत राहून सार्वजनिक सेवा करण्याच्या जबाबदारीवर आधारित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मतदानातून मिळालेला लोकप्रतिनिधित्वाचा अधिकार हा कायद्याच्या अधिकाराला पर्याय ठरू शकत नाही, अशी न्यायालयाची भूमिका आहे. वैद्यकीय व्यावसायिक आपली कर्तव्ये बजावत असताना त्यांना धमकावणे किंवा त्यांच्यावर हल्ला करणे गंभीर बाब असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्याचबरोबर, वैद्यकीय कर्मचाऱ्यांनीही आपल्या कर्तव्यात कसूर केल्यास त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे.

खटला सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश

सर्वोच्च न्यायालयाने संबंधित खटला सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, परिस्थितीत भविष्यात लक्षणीय बदल झाल्यास आरोपींना योग्य न्यायालयात पुन्हा जामिनासाठी अर्ज करण्याची मुभा असल्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील इतर ठिकाणी वैद्यकीय कर्मचाऱ्यांशी संबंधित घडलेल्या घटनांचाही न्यायालयाने संदर्भ घेतला. लोकप्रतिनिधींशी संबंधित अशा घटनांची पुनरावृत्ती दुर्लक्षित करता येणार नाही, असे न्यायालयीन निरीक्षण नोंदवण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आता रमेश म्हात्रे आणि अन्य आरोपी न्यायालयासमोर कधी शरण येतात, तसेच पुढील न्यायालयीन प्रक्रिया कोणत्या दिशेने जाते, याकडे लक्ष लागले आहे.

२३ वर्षांच्या अंजली सरदाना यांनी उभारली कोट्यवधींची कंपनी; हजारो महिलांना रोजगाराची संधी!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: भारतातील घरगुती कामांसाठी विश्वासू आणि प्रशिक्षित मदतनीस मिळवणे ही अनेक कुटुंबांसमोरील रोजची समस्या आहे. याच समस्येवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तोडगा शोधण्याचा प्रयत्न करत अवघ्या २३व्या वर्षी अंजली सरदाना यांनी Pronto या होम-सर्व्हिस स्टार्टअपची उभारणी केली. अमेरिकेतील शिक्षण, गुंतवणूक क्षेत्रातील अनुभव आणि भारतीय बाजारपेठेतील समस्या यांची सांगड घालत त्यांनी अल्पावधीत कंपनीचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला आहे. अंजली सरदाना यांनी २०२४ मध्ये अमेरिकेतील George-town Universityमधून Biology विषयात पदवी घेतली. शिक्षणानंतर पारंपरिक नोकरी करण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यापूर्वी त्यांनी 8VC आणि Bain Capital यांसारख्या संस्थांमध्ये गुंतवणूक क्षेत्रातील कामाचा अनुभव घेतला. या अनुभवातून स्टार्टअप, व्यवसाय आणि गुंतवणुकीच्या जगाची त्यांना जवळून ओळख झाली. घरकामाच्या समस्येतून व्यवसायाची कल्पना भारतातील घरगुती सेवा क्षेत्राचा अभ्यास करताना अंजली यांच्या लक्षात आले की, अनेक कुटुंबांना अचानक गरज भासल्यास विश्वासू घरकामगार शोधणे कठीण जाते. दुसरीकडे या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक व्यक्तींना नियमित काम, उत्पन्न आणि कामाच्या सुरक्षिततेबाबत अनिश्चितेला सामोरे जावे लागते. यातूनच घरकामाची मदत गरजेनुसार आणि कमीतकमी वेळेत उपलब्ध करून देण्याची कल्पना पुढे आली. Prontoच्या माध्यमातून ग्राहकांना घराची साफसफाई, स्वयंपाकघर व बाथरूम स्वच्छ करणे, भांडी धुणे, कपडे धुणे, इस्त्री आणि इतर दैनंदिन कामांसाठी प्रशिक्षित व्यक्ती बुक करता येते. कंपनीचे मॉडेल



तंत्रज्ञानासोबत प्रशिक्षित आणि पार्श्वभूमी पडताळणी केलेल्या कामगारांच्या व्यवस्थापनावर आधारित आहे. १७० बुकिंगपासून १८ हजारांहून अधिक बुकिंग Prontoची सुरुवात गुरुग्राममधील एका हबपासून झाली. सुरुवातीला कंपनीकडे दररोज सुमारे १७० बुकिंग होत होती. मात्र मागणी झपाट्याने वाढत गेली आणि २०२६च्या सुरुवातीला कंपनीने दररोज १८ हजारांहून अधिक बुकिंगचा टप्पा गाठला. कंपनीचा विस्तार दिल्ली-एनसीआरसह बंगळुरू, मुंबई, हैदराबाद, चेन्नई आदी शहरांमध्ये झाला आहे. मार्च २०२६ मध्ये Prontoने Epiq Capitalच्या नेतृत्वाखाली २५ दशलक्ष डॉलरची Series B गुंतवणूक उभारली. त्या वेळी कंपनीचे मूल्यांकन सुमारे १०० दशलक्ष डॉलर होते. त्यानंतरच्या निधी उभारणीमुळे कंपनीचे मूल्यांकन आणखी वाढले. सप्टेंबर २०२६ मधील अहवालानुसार Prontoचे ताजे नोंदवलेले मूल्यांकन सुमारे २०२ दशलक्ष डॉलर म्हणजेच जवळपास २,००० कोटी रुपये होते. महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी Prontoच्या वाढीतील महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांचा मोठा सहभाग. एप्रिल २०२६ मध्ये संस्थापक अंजली सरदाना यांनी कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर ४,५०० हून अधिक सक्रिय प्रोफेशनल्स असल्याचे सांगितले होते. त्यापैकी सुमारे ९९ टक्के महिला असल्याचे त्यांनी नमूद केले होते. कंपनी प्रशिक्षण, शिफ्ट-आधारित काम आणि अधिक नियमित उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या मॉडेलवर भर देते. अल्पावधीत Prontoने घेतलेली झेप ही भारतातील घरगुती सेवा क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाधारित व्यवसाय मॉडेलचे उदाहरण ठरली आहे. एका बाजूला ग्राहकांना आवश्यकतेच्या वेळी घरकामासाठी मदत मिळवून देणे आणि दुसऱ्या बाजूला मोठ्या संख्येने महिलांना संरचित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, या दोन गरजांना जोडण्याचा प्रयत्न अंजली सरदाना यांच्या व्यवसायातून दिसून येतो. अवघ्या २३व्या वर्षी व्यवसायाच्या पारंपरिक चौकटीपलीकडे विचार करून अंजली यांनी समस्या ओळखली, तंत्रज्ञानाची जोड दिली आणि त्यातून वेगाने विस्तारत जाणारे स्टार्टअप उभे केले. २,००० कोटींचे मूल्यांकन आणि हजारो महिलांचा सहभाग ही Prontoच्या आजवरच्या प्रवासातील महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

दुष्काळाची झळ! महाराष्ट्रासह 18 राज्यांचा रेड झोनमध्ये समावेश

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाला आहे. परतीच्या मान्सूनने पंजाब, हरियाणा व राजस्थानचा काही भाग ओलांडला आहे. तर महाराष्ट्रातून हा परतीचा मान्सूनचा (Maharashtra Monsoon Rain News) प्रवास 5 ते 10 ऑक्टोबरच्या दरम्यान होणार आहे. अशातच, बहुतांश वेळा परतीचा मान्सून महाराष्ट्रात पाऊस (Maharashtra Rain) देऊन जातो. मात्र सध्या भारतावर प्रतिचक्रवाद स्थिती तयार झाली आहे. जी ढगांना एकत्र येऊ देत नाही. त्यामुळे परतीचा मान्सून महाराष्ट्रात पाऊस देण्याची शक्यता नसल्याचे नागपूर वेध शाळेने (IMD) सांगितले आहे. परिणामी महाराष्ट्राच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या वाट्याला निराशाच देणारा असल्याचे बोललं जात आहे. त्यामुळे एकीकडे महाराष्ट्र दुष्काळाच्या झळा सोसत असताना आगामी काळ अधिक अडचणींचा ठरणार असल्याची शक्यता आता अधिक वाढली आहे. सध्या देशात ओडिसा हे एकमेव राज्य आहे, जेथे सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. तर महाराष्ट्रासह 18 राज्य असे आहे जेथे 20 टक्क्यापेक्षा जास्त पावसाची तूट असल्याचे आकडेवारीनुसार समोर आलं आहे. परिणामी या 18 राज्यांना रेड झोनमध्ये टाकण्यात



आले आहे. तिकडे पश्चिम विदर्भात तर परिस्थिती आणखी बिकट आहे.

अकोला आणि अमरावती जिल्ह्यात पावसाची तूट हि 40 टक्क्यापेक्षा अधिकवर पोहचली आहे. महाराष्ट्रातील बहुतांश भागात पाऊसच झाला नाही.

सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. पावसाचे चारही महिने कोरडेच गेले आहेत. दीड महिने तर राज्यातील अनेक भागात पावसाचा एक थेंबही पडला नाही. काही ठिकाणी पाऊस झाला, पण तोही समाधानकारक नव्हता. त्यामुळे राज्यात मोठा दुष्काळ पडला आहे. हवामान खात्याच्या दाव्यानुसार, एक दशकानंतर राज्यात यंदा सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे. यावरुन राज्यातील संकट किती मोठं आहे, हे दिसून येतं. पाऊस कमी झाल्याने रब्बी पेरणीवरही संकट उभं राहिलं आहे. त्यामुळे बळीराजाचं टेन्शन वाढलं आहे. एक दशकानंतर राज्यात या वर्षी सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे. यंदा राज्यातील पावसाची सरासरी तूट 18 टक्के आहे. राज्यातील सर्वच विभागात यावर्षी पावसाची कमी जास्त प्रमाणात तुट निर्माण झाली आहे. मात्र, येणाऱ्या 5 ते 6 दिवसात राज्यात सर्वदूर पाऊस होण्याची कमी शक्यता. असं असलं तरी राज्यातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाचा सल्ला घेऊनच रब्बी हंगामात पेरणी करावी, असा सल्ला एस.डी. सानप यांनी दिला आहे.मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाला आहे.

शिवभोजन केंद्रांवर सर्जिकल स्ट्राईक!

मुंबई : महायुती सरकारने राज्यातील गरीब, मजूर आणि गरजू नागरिकांसाठी अत्यंत सवलतीच्या दरात दिल्या जाणाऱ्या 'शिवभोजन योजने'च्या (Shivbhojan Yojana) अंमलबजावणीबाबत अत्यंत मोठा आणि कडक निर्णय घेतला आहे. योजनेतील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने (Food and Civil Supplies Department) जुने सर्व परिपत्रक अधिक्रमित करून नवी सर्वसमावेशक नियमावली जारी केली आहे.

पेपरफुटीविरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार

रोहित पवारांचा जोशी पुलावर ठिय्या

जन सम्राट टाईम्स



मुंबई | प्रतिनिधी: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) औषध निरीक्षक (Drug Inspector) परीक्षेतील पेपरफुटीमुळे (paper leak) राज्यभरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो उमेदवारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांनी तातडीने राजीनामा (resignation) द्यावा, या मुख्य मागणीसाठी पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर विद्यार्थ्यांनी गुरुवारी सायंकाळपासून ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार (Rohit Pawar) यांनी स्वतः रात्रभर विद्यार्थ्यांसोबत या आंदोलनात सहभाग घेतला आहे. बुधवारी (30 सप्टेंबर) विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांची भेट घेतली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सचिवाची बदली आणि अध्यक्षांची न्यायालयीन चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनानंतर काही सदस्यांनी 2 ऑक्टोबरचे आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले होते. मात्र, गुरुवारी सायंकाळी पुण्यातील इंदुलाल कॉम्प्लेक्स येथे झालेल्या बैठकीत बहुतांश परीक्षार्थ्यांनी अध्यक्षांच्या तडकाफडकी राजीनाम्याची मागणी लावून धरली. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेत अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी मान्य न झाल्याने संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू ठेवण्याचा पवित्रा घेतला.आमदार रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांना पाठिंबा देत थेट पुलावरच मुक्काम ठोकला. "एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांचा राजीनामा हीच विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे. राज्य सरकार या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे आम्ही पुण्यातील एस. एम. जोशी पुलाजवळ विद्यार्थ्यांसोबत सत्याग्रह सुरू केला आहे. आता अध्यक्षांच्या राजीनाम्याशिवाय माघार घेतली जाणार नाही." असा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. दरम्यान, या आंदोलनाची दखल घेत आज (शुक्रवारी) खासदार सुप्रिया सुळे (Supriya Sule) आणि आमदार विश्वजीत कदम (Vishwajeet Kadam) हे आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांना पाठिंबा दर्शवणार आहेत. स्पर्धा परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच (offline exam mode) पार पडाव्यात आणि इतर परीक्षांमध्येही पेपरफुटी झाली आहे का, याची सखोल चौकशी (in-depth investigation) व्हावी, या मागण्यांवर विद्यार्थी ठाम आहेत. एस. एम. जोशी पुलावर सुरू असलेल्या या सत्याग्रहामुळे (satyagraha) प्रशासनावरील आणि राज्य सरकारवरील दबाव चांगलाच वाढला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

“शंख हाडापासून बनलेला असतो”, बद्रीनाथ धामातील वादावरुन राजकारण

भाजपा मंत्र्याच्या वक्तव्यानंतर काँग्रेस आक्रमक!विज्ञान आणि सनातन परंपरेचा अभाव: काँग्रेस

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बद्रीनाथ धामात शंख का वाजवला जात नाही? या धार्मिक आणि पौराणिक परंपरेवरून आता उत्तराखंडमध्ये नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. “शंख हा हाडापासून बनलेला असतो, म्हणूनच बद्रीनाथ मंदिराच्या आत शंख वाजवण्यास मनाई आहे,” असा दावा उत्तराखंडचे भाजपाचे सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री सतपाल महाराज यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला असून, मंत्र्यांना विज्ञान आणि सनातन धर्म या दोन्ही गोष्टींचे ज्ञान नसल्याची टीका केली आहे. या संदर्भातील वृत्त ‘द इंडियन एक्सप्रेस’ने दिले आहे.काही दिवसांपूर्वी बद्रीनाथ धाम परिसर एका सांस्कृतिक कार्यक्रमात झालेल्या संगीत आणि नृत्यामुळे चर्चेत आला होता. या पार्श्वभूमीवर बद्रीनाथमधील परंपरांवरून विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सतपाल महाराज यांनी हे विधान केले.काही दिवसांपूर्वी बद्रीनाथ येथील ‘टुरिस्ट अरायव्हल प्लाझा’ येथे दोन दिवसीय ‘देवभूमी सांस्कृतिक महोत्सव २०२६’ पार पडला. भारतीय सैन्याचे ‘ऑपरेशन सद्भावना’, चमोली जिल्हा प्रशासन आणि उत्तराखंड पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.उत्तराखंडची लोकसंस्कृती, हस्तकला, स्थानिक खाद्यपदार्थ आणि सीमावर्ती भागातील संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. मात्र, प्रसिद्ध गायिका प्रियंका मेहेर हिच्या



संगीताचा आणि नृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या महोत्सववरून वाद पेटला.

पवित्र धामाच्या परिसरात अशा प्रकारचा संगीताचा कार्यक्रम आयोजित केल्याने धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करण्यात आला भाजपचे ज्येष्ठ नेते मुरली मनोहर जोशी यांनीही यावर आक्षेप घेतला होता. “बद्रीनाथ धामच्या अध्यात्मिक आणि धार्मिक मर्यादेला बाधा आणणाऱ्या अशा डीजे व संगीताच्या कार्यक्रमांना परवानगी देणे अयोग्य आहे,” असे स्पष्ट करत त्यांनी केंद्र व राज्य सरकारला यात हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले होते.मंत्र्यांच्या दाव्यानंतर उत्तराखंड काँग्रेसने या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले आहे. काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सूर्यकांत धस्माना यांनी सतपाल महाराज यांच्यावर थेट टीका केली. “शंख हे कोणतेही हाड नसून, तो समुद्री जिवाचे बाह्य कवच असतो, जे प्रामुख्याने कॅल्शियम कार्बोनेटपासून बनलेले असते. शंखाला हाड म्हणणे हा विज्ञानाचा आणि शतकानुशतके चालत आलेल्या सनातन परंपरांचा अपमान आहे,” असे धस्माना म्हणाले. काँग्रेसने आता या प्रकरणी मंत्री सतपाल महाराज यांनी सार्वजनिक माफी मागावी आणि मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी “शंख हाडापासून बनलेला असतो” या मंत्र्यांच्या विधानाशी सरकार सहमत आहे का, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी जोरदार मागणी केली आहे. वाद पेटल्यानंतर चमोली जिल्हा प्रशासनाने या आयोजनापासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रशासनाने स्पष्ट केले की, त्यांनी केवळ स्टॉल्स आणि इतर व्यवस्थेसाठी सहकार्य केले होते, तर कार्यक्रमाची रूपरेषा आणि सादरीकरण पूर्णपणे सैन्याने ठरवले होते. तसेच, बद्रीनाथचे पौराणिक, अध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व लक्षात घेऊनच पुढील कार्यक्रम आयोजित करावेत, असा सल्ला स्थानिक लष्करी अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. नागरिकांनी सोशल मीडियावरील अर्धवट माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बद्रीनाथ धामात शंख का वाजवला जात नाही? या धार्मिक आणि पौराणिक परंपरेवरून आता उत्तराखंडमध्ये नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. “शंख हा हाडापासून बनलेला असतो, म्हणूनच बद्रीनाथ मंदिराच्या आत शंख वाजवण्यास मनाई आहे,” असा दावा उत्तराखंडचे भाजपाचे सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री सतपाल महाराज यांनी केला आहे.

रायगडमध्ये दिवेआगार समुद्रात 8 विद्यार्थी बुडाले

सर्व विद्यार्थी हे पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील एका खासगी क्लासचे होते विद्यार्थी

जन सम्राट टाईम्स

रायगड। प्रतिनिधी : रायगडमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला आहे. एका खासगी क्लासची सहल दिवेआगर येथे आली होती. सर्व विद्यार्थी हे पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील एका खासगी क्लासचे विद्यार्थी होते. हे सर्व विद्यार्थी एकत्र सहलीला आले होते. या दरम्यान पाण्याचा अंदाज न आल्याने 8 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,सर्व विद्यार्थी विनर्स अॅकॅडमी या क्लासचे विद्यार्थी होते. आठही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व विद्यार्थी इयत्ता अकरावी आणि बारावीचे होते. एकूण 42 विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगरच्या समुद्रकिनाऱ्यावर गेले होते. यामध्ये 17 मुली आणि 25 मुलांचा समावेश होता. आठही विद्यार्थ्यांचे मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले आहे. तसेच इतर विद्यार्थी आणि शिक्षकदेखील याच आरोग्य केंद्रावर असल्याची माहिती आहे. विद्यार्थ्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान, त्यांना वाचवण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले. सर्वांना शोधून समुद्रातून बाहेर काढण्यात आलं. यावेळी इतर विद्यार्थी, पोलीस आणि शिक्षकांनी या सर्व विद्यार्थ्यांना सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. आठही विद्यार्थ्यांचा या घटनेत मृत्यू झाला. तहसीलदार यांची प्रतिक्रिया दिवेआगरचे तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांनी एका वृत्तवाहिनीला या घटनेवर प्रतिक्रिया दिली. "आम्हाला



मिळालेल्या माहितीनुसार आळंदीची ऑन द वे आहोत. घटनास्थळी पोहोचत आहोत", अशी प्रतिक्रिया तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांनी दिली. स्थानिक नागरीक, पोलीस आणि महसूल विभागाचे कर्मचारी यांनी बचावकार्य केलं, अशीदेखील माहिती त्यांनी दिली. रोहित पवार यांच्याकडून दु:ख व्यक्त या घटनेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. "दिवेआगार इथं सहलीसाठी गेलेल्या आळंदी येथील खासगी क्लासच्या 8 विद्यार्थ्यांचा पोहण्यासाठी गेले असताना समुद्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याचं वृत्त अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारं आहे. या सर्व विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! या दुखातून सावरण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबियांना मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना! या कठीण प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांप्रती माझ्या सहवेदना आहेत. मुळात ही घटना कशी घडली याचा सखोल तपास झाला पाहिजे", असं रोहित पवार म्हणाले आहेत.

आमदार महेंद्र दळवी यांची प्रतिक्रिया

स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. "घडलेली घटना ही दुर्दैवी आहे. तिथल्या स्थानिक प्रशासनाने काळजी घेणं गरजेचं होतं. गार्ड ठेवणं गरजेचं होतं. कारण त्या ठिकाणी वारंवार अशा घटना घडत आहेत. पर्यटकांना समुद्राचा अंदाज नसतो. त्यामुळे अशा दुर्घटना घडतात. ही दुखद घटना आहे. स्थानिक प्रशासनाने काळजी घेणं आवश्यक होतं. तिथे लाईफ गार्ड, गाईड करणारं कुणी नाही, असं दिसत आहे. बाहेरुन येणाऱ्या लोकांना समुद्राचा अंदाज नाही. समुद्राचा भरती-ओहोटीचा अंदाज घेणं ही काळाजी गरज आहे. म्हणून तिथे गार्ड असणं गरजेचं आहे. तिथल्या प्रशासनाने काळजी घेणं गरजेचं होतं. वारंवार अशा घटना घडत आहेत. कित्येक लोकांचा यामध्ये बळी जात आहे", अशी प्रतिक्रिया महेंद्र दळवी यांनी दिली. रायगडमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. दिवेआगरच्या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला आहे. एका खासगी क्लासची सहल दिवेआगर येथे आली होती. सर्व विद्यार्थी हे पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील एका खासगी क्लासचे विद्यार्थी होते. हे सर्व विद्यार्थी एकत्र सहलीला आले होते. या दरम्यान पाण्याचा अंदाज न आल्याने 8 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,सर्व विद्यार्थी विनर्स अॅकॅडमी या क्लासचे विद्यार्थी होते. आठही विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व विद्यार्थी इयत्ता अकरावी आणि बारावीचे होते. एकूण 42 विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगरच्या समुद्रकिनाऱ्यावर गेले होते. यामध्ये 17 मुली आणि 25 मुलांचा समावेश होता. आठही विद्यार्थ्यांचे मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले आहे. तसेच इतर विद्यार्थी आणि शिक्षकदेखील याच आरोग्य केंद्रावर असल्याची माहिती आहे. विद्यार्थ्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान, त्यांना वाचवण्यासाठी तातडीने प्रयत्न करण्यात आले. सर्वांना शोधून समुद्रातून बाहेर काढण्यात आलं. यावेळी इतर विद्यार्थी, पोलीस आणि शिक्षकांनी या सर्व विद्यार्थ्यांना सीपीआर देण्याचा प्रयत्न केला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

उत्सव साधेपणाने साजरे करा



जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी नवरात्रोत्सव आणि अन्य धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम साधेपणाने साजरे करून उत्सवांवरील खर्चात बचत करावी आणि ही रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्यात यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. शिवसेना पदाधिकारी, सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी या संकटाच्या काळात सामाजिक बांधिलकीतून पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे. विदर्भ, मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांत पावसाने ओढ दिल्यामुळे दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पावसाअभावी उभी पिके करपल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर उत्सवांच्या खर्चाला काही प्रमाणात मर्यादा घालून त्यातून उपलब्ध होणारा निधी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरण्याचे आवाहन शिंदे यांनी केले.'राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क आमच्या बळीराजाचा आहे,' या भूमिकेचा पुनरुच्चार करताना शिंदे यांनी सरकारकडून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना सुरू असल्याचे सांगितले.

मात्र नैसर्गिक संकटाच्या काळात केवळ शासनानेच नव्हे, तर समाजानेही पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.शेतकरी संकटात असताना नवरात्रोत्सव किंवा अन्य सण मोठ्या थाटामाटात साजरे करणे योग्य ठरणार नाही, त्यामुळे सार्वजनिक मंडळांनी उत्सवांचे स्वरूप साधे ठेवावे. शिवसेनेचे पदाधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिकांनीही उत्सवांवरील अनावश्यक खर्च टाळून बचत झालेला निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना थेट मदत आणि पुनर्वसनासाठी देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजजीवनाचा महत्त्वाचा आधार आहे.

अन्नदाता संकटात असताना त्याच्या मदतीला समाजातील विविध घटकांनी पुढे येणे आवश्यक असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. शासनाच्या मदतीबरोबरच सामाजिक सहभाग वाढल्यास संकटग्रस्त कुटुंबांना आधार मिळू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उत्सवावरील खर्चात बचत करून एखाद्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला आधार देता आला, त्याच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य आणता आले, तर तीच आदिशक्ती जगदंबेची खरी सेवा ठरेल, असे आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी केले.राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी नवरात्रोत्सव आणि अन्य धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम साधेपणाने साजरे करून उत्सवांवरील खर्चात बचत करावी आणि ही रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्यात यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

धुळ्याच्या २५ कुस्तीपटूंचा कोल्हापुरात होणार सन्मान

एकवीरा देवीचे दर्शन घेऊन कुस्तीपटू कोल्हापूरकडे रवाना

जन सम्राट टाईम्स

धुळे| प्रतिनिधी: धुळे जिल्ह्याच्या कुस्ती क्षेत्रासाठी अभिमानाची बाब समोर आली असून, धुळे व जळगाव जिल्ह्यातील २५ प्रख्यात कुस्तीपटूंचा कोल्हापूर येथे आयोजित राष्ट्रीय कुस्ती परिषदेत सन्मान करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कुस्तीपटूंनी खानदेश कुलस्वामिनी आई एकवीरा देवीचे दर्शन घेतल्यानंतर कोल्हापूरकडे प्रस्थान केले. रवानगीपूर्वी कुस्तीपटूंचा सत्कार करून त्यांना शुभेच्छांसह निरोप देण्यात आला. यावेळी कुस्ती क्षेत्रातील पदाधिकारी, माजी खेळाडू, प्रशिक्षक आणि कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. २ ऑक्टोबरला कोल्हापुरात राष्ट्रीय कुस्ती परिषद आयोजकांच्या माहितीनुसार, महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर येथे राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस महाराष्ट्रासह देशातील कुस्ती क्षेत्रातील मान्यवर व दिग्गज उपस्थित



राहणार आहेत. या परिषदेत धुळे व जळगाव जिल्ह्यातील कुस्तीपटूंच्या योगदानाची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे या सोहळ्याकडे खानदेशातील कुस्तीप्रेमींचे लक्ष लागले आहे. अनुभवी कुस्तीपटूंचा समावेश कोल्हापुरात सन्मान होणाऱ्या कुस्तीपटूंमध्ये प्रथम महापौर भगवान करणकाळ, पै. कल्याण गरुड, पै. राम कानडे, पै. गोरख पाटील, पै. जितू इखे, पै. अनिल थोरात, पै. बंटी पप्पया, पै. केतन जाधव, पै. मनोज घोडके, पै. गोपाल चौधरी, पै. विष्णू जावडेकर, पै. ज्ञानेश्वर फुलपगारे, पै. राजेंद्र देवरे, पै. जालिंदर जाधव, पै. छोटू शहा, पै. जगदीश सरोदे, पै. हंसराज माळी, पै. वसंत हरळ, पै. भूषण गायकवाड, पै. राहुल बागुल आणि पै. राजेंद्र गवळी यांचा समावेश आहे. धुळे व जळगाव जिल्ह्यातील या कुस्तीपटूंच्या कामगिरीची राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठावर दखल घेतली जात असल्याने खानदेशातील कुस्ती क्षेत्रासाठी हा महत्त्वाचा प्रसंग मानला जात आहे. त्यांच्या सन्मानामुळे नव्या पिढीतील कुस्तीपटूंनाही प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. धुळे जिल्ह्याच्या कुस्ती क्षेत्रासाठी अभिमानाची बाब समोर आली असून, धुळे व जळगाव जिल्ह्यातील २५ प्रख्यात कुस्तीपटूंचा कोल्हापूर येथे आयोजित राष्ट्रीय कुस्ती परिषदेत सन्मान करण्यात येणार आहे.

शासकीय कार्यालयांच्या दारातच कचऱ्याचे साम्राज्य!

पाणीपुरवठा टाकीजवळ कचऱ्याचे ढीग, आरोग्याचा प्रश्न

जन सम्राट टाईम्स

ममुराबाद। प्रतिनिधी: ममुराबाद येथील वर्दळीच्या आणि महत्त्वाच्या शासकीय परिसरातच मोठ्या प्रमाणावर कचरा साचल्याचे चित्र समोर आले आहे. ग्रामपंचायत कार्यालय, सरकारी दवाखाना, अंगणवाडी तसेच पाणीपुरवठ्याच्या पाण्याच्या टाकीखालील परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याने अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत असून, संबंधित यंत्रणेने तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. शासकीय कार्यालयांचा परिसरच अस्वच्छतेच्या विळख्यात ग्रामपंचायत कार्यालय हे गावाच्या प्रशासकीय कामकाजाचे केंद्र मानले जाते.

त्याच परिसरात सरकारी दवाखाना आणि अंगणवाडी असल्याने येथे दररोज नागरिक, महिला, रुग्ण आणि



लहान मुलांची वर्दळ असते. मात्र, याच संवेदनशील परिसरात कचऱ्याचे ढीग साचल्याने प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. साचलेल्या कचऱ्यामध्ये प्लास्टिक, टाकाऊ वस्तू तसेच कुजणाऱ्या कचऱ्याचा समावेश असल्याचे दिसून येत असून, त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. पाणीपुरवठ्याच्या टाकीजवळील अस्वच्छतेमुळे नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती कचरा आणि अस्वच्छतेमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः अंगणवाडीत येणाऱ्या लहान मुलांसह दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठ्याच्या टाकीच्या परिसरात कचरा साचल्याने पिण्याच्या पाण्याच्या स्वच्छतेबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र, पाणी दूषित झाल्याचे कोणतेही अधिकृत निदान उपलब्ध नसल्याने याबाबत प्रशासनाने आवश्यक तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे.

अहिल्यानगर: उमेदवारीसाठी इच्छुकांची झुंबड

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर । प्रतिनिधी: जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दिग्गज इच्छुकांनी आज, गुरुवारी निवडणूक कार्यालयात मोठी गर्दी केली होती. आजी-माजी आमदार, खासदार, बँकेचे आजी-माजी अध्यक्ष, संचालक अशा अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. आजपर्यंत एकूण ८४६ अर्जांची विक्री झाली असली



तरी एकूण १०९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. संचालक मंडळाच्या २२ जागा आहेत. उद्या, शुक्रवार, शनिवार व रविवार असे तीन दिवस सुट्टीचे असल्यामुळे आज उमेदवारी दाखल करण्यासाठी राजकीय नेते आपल्या समर्थकांसह निवडणुका कार्यालयात डेरेदाखल झाले होते. काहींच्या समर्थकांनी अर्ज दाखल करतानाच विजयाचा दावा करत जोरदार घोषणाबाजीही केली. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ एक दिवस बाकी आहे. त्यासाठी सोमवारी अखेरचा दिवस आहे.खासदार नीलेश लंके, आमदार आशुतोष काळे, आमदार मोनिका राजळे, आमदार किरण लहामटे, आमदार काशिनाथ दाते, यांच्यासह माजी आमदार चंद्रशेखर घुले, वैभव पिचड, यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले .

कोणाला डावलले तर निवडणूक बिनविरोध होणार नाही : लंके

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: जिल्हा सहकारी बँक शेतकऱ्यांची 'कामधेनू' म्हणून ओळखली जाते. जिल्ह्यात सध्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून शेतकरी मोठ्या संकटातून जात आहे. अशा परिस्थितीत जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणे गरजेचे आहे. निवडणूक सर्वसंमतीने बिनविरोध होत असेल तर त्याचे निश्चितच स्वागत केले पाहिजे. मात्र, व्यक्तिद्वेषातून किंवा एखाद्याला डावलून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला, तर ती बिनविरोध होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली. जिल्हा बँक निवडणुकीसाठी खासदार लंके यांनी आज, गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली. निवडणूक ठरवून होत नसते. वेळप्रसंगी निर्णय घेतले जातात, त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करताना झालेली गर्दी हे शक्तिप्रदर्शन नाही. शक्तिप्रदर्शन करायचे असते तर हजारो लोक आणले असते. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध झाली पाहिजे, याबाबत आमचे सर्वांचेच एकमत आहे. महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली असून, निवडणूक बिनविरोध होत असेल तर त्याचे स्वागत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, यासाठी प्रमुख मंडळींनी मतभेद बाजूला ठेवून, सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला तर बिनविरोध निवडणुकीचा मार्ग मोकळा होऊ शकतो. परंतु व्यक्तीद्वेषातून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला तर त्याला आपला विरोध राहील, असे लंके यांनी सांगितले.दरम्यान, जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी कोणाचा 'अजेंडा' अथवा उमेदवार निश्चित झाला आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला असता अध्यक्षपदाचा निर्णय निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल, असे लंके यांनी सांगितले. सध्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर आणि उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतरच बिनविरोध निवडणुकीचे खरे चित्र स्पष्ट होईल. निवडून आलेल्या संचालक मंडळात बहुमत कोणाच्या बाजूने आहे, त्यानुसार अध्यक्षाची निवड केली जाते. त्यामुळे आताच अध्यक्षपदाचा उमेदवार ठरला आहे, असे म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.पालकमंत्री विखे जामखेड तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करीत असल्याबाबत बोलताना लंके यांनी सरकारकडून दुष्काळग्रस्तांना तातडीने ठोस मदत देण्याची मागणी केली. केवळ आश्वासन देऊन भागणार नाही. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने प्रत्यक्ष मदत मिळणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील 265 तालुक्यांत दुष्काळ जाहीर

कृषी विभागातील २५८ उमेदवार अद्याप नियुक्तीच्या प्रतीक्षेत

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या 'महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२४' मध्ये निवडलेले २५८ उमेदवार नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. यामध्ये ४८ कृषी उपसंचालक, ५३ तालुका कृषी अधिकारी आणि १५७ कृषी अधिकारी (कनिष्ठ) या पदांचा समावेश आहे. संपूर्ण राज्यात दुष्काळाचे संकट घोंघावत असून कृषी विभागाला मनुष्यबळाची निकड असताना नियुक्तीत कालापव्यय झाल्याची तक्रार भरती प्रक्रिया सुधारणांसाठी सरकारने स्थापलेल्या उच्चस्तरीय कृती गटासमोर करण्यात आली. कृषी विभागाने हे आक्षेप नाकारत संबंधितांच्या जात वैधता प्रमाणपत्रांची छाननी प्रगतीपथावर असल्याचे म्हटले आहे.महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांत सरकारने दुष्काळ जाहीर केला. उर्वरित तालुके करपलेली पिके व मंत्र्यांच्या मागणीनुसार विशेष बाब म्हणून दुष्काळी यादीत समाविष्ट होत आहे. या स्थितीत शेतकरी बांधवांचे प्रश्न, कृषी विभागाची क्षेत्रीय स्तरावरील मनुष्यबळाची गरज आणि दोन वर्षांपेक्षा अधिक काळ (जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून) प्रतीक्षेत असलेल्या



२५८ उमेदवारांचे भवितव्य, याकडे उच्चस्तरीय कृती गटाचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी शासकीय भरती परीक्षा, त्यांचा निकाल आणि निकालानंतर नियुक्ती यातील अनिश्चिततेवर अनेकांनी बोट ठेवले. राज्यातील हवामानातील अनिश्चितता, शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती पाहता शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर मनुष्यबळाची अत्यंत निकड आहे. या परीक्षेतून कृषी उपसंचालक, तालुका कृषी अधिकारी आणि कृषी अधिकारी (कनिष्ठ) या तीन पदांसाठी निवडलेल्या २५८ उमेदवारांची यादी व शिफारस पत्र जून २०२६ मध्ये कृषी विभागास प्राप्त झाले. जुलैमध्ये मूळ कागदपत्रांची पडताळणी झाली. चारित्र्य पडताळणी १०० टक्के आणि वैद्यकीय तपासणी ९७.२८ टक्के पूर्ण झाल्याचे शिफारसपात्र उमेदवारांनी म्हटले आहे. निवड यादी प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यात नियुक्तीपत्र देणे बंधनकारक असते. हा कालावधी उलटला असून तात्काळ रुजू करून घेण्यासाठी नागरी सेवा मंडळाची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली.आयोगाने समांतर कालावधीत परीक्षा घेतलेल्या इतर सर्व प्रमुख संवर्गातील म्हणजे राज्यसेवा स्थापत्य, वनसेवा, स्थापत्य अभियांत्रिकी सेवा यातील शिफारसपात्र उमेदवारांना शासनाने विहित मुदतीत रुजू करून घेतले. केवळ कृषी सेवेतील २५८ उमेदवारांची नियुक्ती प्रलंबित असल्याकडे संबंधितांनी लक्ष वेधले.शासनाच्या २०२५ च्या निर्णयानुसार या उमेदवारांची जात वैधता व अन्य प्रमाणपत्रांची पडताळणी केली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या!

गिरणा नदीपात्रातील अवैध वाळू उपसा थांबवा; भाजप किसान मोर्चाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी: भडगाव तालुक्यासह जळगाव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा द्यावा, तसेच भडगाव येथील गिरणा नदीपात्रातील कथित अवैध वाळू उपसा व वाहतूक थांबवावी, अशा विविध मागण्यांचे निवेदन भाजप किसान मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना देण्यात आले. भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास मोरे, जिल्हा सरचिटणीस सोमनाथ पाटील, जिजाबराव पाटील, रत्नाकर पाटील आणि बापुराव पाटील यांच्या उपस्थितीत हे निवेदन सादर करण्यात आले. गिरणा नदीपात्रातील वाळू उपशावर कारवाईची मागणी निवेदनात भडगाव येथील गिरणा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा उपशामुळे भविष्यात भूजल पातळीवर परिणाम होऊन शेती तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो, अशी भूमिका किसान मोर्चाने मांडली. त्यामुळे अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून हा प्रकार थांबवावा, अशी मागणी करण्यात आली. जळगाव जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर नदीपात्रातील वाळू उत्खननासाठी २०२६ चा जिल्हा सर्वेक्षण अहवाल तसेच २०२६-२७ साठी वाळू गटांच्या ई-निविदा व ई-लिलावासंबंधी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. पीकविमा व दुष्काळी मदतीची मागणी दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रलंबित



